# दलित आत्मकथनातील मानवी हक्कांचे दर्शन—'अंतस्फोट' व 'मरणकळा' या आत्मकथनाच्या अनुषंगाने

प्रा. डॉ. सुजय बाबुराव पाटील, मराठी विभाग प्रमुख, कमला कॉलेज, कोल्हापूर. मो. ८४२१६६८४०६
ई मेलः sujaybpatil@rediffmail.com

---

**प्रस्तावना**

दलित साहित्य प्रवाहाने मराठी साहित्याला, भाषेला समृध्द केलेले आहे. गावकुसाबाहेर पशुवत जगायला भाग पडलेल्या समाजाला त्याच्या सर्व बाबतीतील उध्दाराला हक्क, अधिकार आहे. याची जाणीव दलित साहित्याने करुन दिलेली आहे. "प्रत्येक व्यक्तीला कोणत्याही भेदभावाशिवाय आणि जन्मत:च प्राप्त झालेले किमान मानवी अधिकार म्हणजे मानवाधिकार होय". हे ज्येष्ठ विचारवंत डी.डी. बसु यांचे मत विचारात घेतले तर दलित साहित्य हे पददलित समाजाच्या माणूस म्हणून जगण्याच्या अधिकारासाठी मानवी हक्कासाठी संघर्ष करणारे साहित्य आहे, याची साक्ष दलित कथा, कविता, आत्मकथा, आत्मचरित्र, कादंबरी इ. वाङ्:मय प्रकारामधून येते.

कुमद पवाडे यांच्या 'अंतस्फोट' व जनाबाई गिऱ्हे यांच्या 'मरणकळा' या आत्मकथामधून माणूस म्हणून जगण्याच्या हक्कासाठीचा संघर्ष मानवाधिकारांच्या हक्कासाठीचा संघर्ष कसा दिसून येतो हे या निबंधातून मांडण्याचा हेतू आहे.

'अंतस्फोट' हा कुमुद पवाडे यांचा आत्मकथनात्मक लेख संग्रह आहे. या लेखसंग्रहांच्यामधून लेखिकेचा जीवनपट उलघडत जातोच पण पददलित समाजाबरोबर इतर समाजातील स्त्रीने स्वत:च्या हक्कासंदर्भात विवेकाने विचार करुन लढले पाहिजे, माणूसपणाचे आपले हक्क आपण मिळविले पाहिजे हा विचार इथे मांडलेला आपणास दिसतो. उदा. 'आणि सावित्रीव्रताची अशा रीतीने सांगता होते'. या लेखात रुढी परंपरेच्या नावाखाली सुरु असलेली व्रतवैकल्ये स्त्री ला कशी हतबल ठरवितात. तिच्यामधील आत्मविश्वास घालवितात हे दाखवून देऊन अशा व्रतवैकल्यांच्या मागे न लागता स्वकर्तृव्यावर जगायाचा हक्क निवडावा असा विचार या लेखाच्या माध्यमातून कुमुद पवाडे व्यक्त करतात. लेखिकेची नातेवाईक 'मायाबाई' ही नवऱ्याचे अत्याचार सहन करत जगते. त्याची सर्व व्यसने स्वीकारते, त्याने दुसऱ्या एका स्त्रीला घरात आणून ठेवणेदेखील सहन करते. नवरा कृतघ्न निघून देखील वट सावित्रीचं उपवासाचे व्रत ती करीत राहते.

अशावेळी लेखिका कुमुद पवाडे 'मायाबाई' यांना या व्रतामधील फोलपणा पटवून देते. या व्रतामुळे सातजन्मी हाच नवरा मिळणार असेल तर हाच व्यसनी नवरा तुला परत पुढील जन्मी मिळणार व तुझे मानहानीचे अपमानास्पद जीवन पुन्हा सुरु होणार हे तिला पटवून देते. लेखिका ही व्रतवैकल्ये पुनर्जन्म या गोष्टी कशा काल्पनिक आहेत. समाजाचा व स्त्रीयांचा मानसिक छळ करणाऱ्या आहेत हे पटवून देतात. परिणामी 'मायाबाई' व्रताचा नाद सोडून देते. पारंपरिक रुढींच्या बंधनातून मुक्त होते.

इथे लेखिकेचा पर्यायाने दलित साहित्याचा 'समृध्द जगण्याचा अधिकार व्यक्तिला जन्मापासून प्राप्त झालेला असतो, तो कोणीही हिरावून घेऊ शकत नाही' हा मानवाधिकारी दृष्टिकोन दिसून येतो.

'माझ्या संस्कृतीची कथा' या लेखामधून कुमुद पवाडे यांनी शिक्षण घेण्याचा व ज्ञानदान करण्याचा हक्क सर्वांना समान आहे. जाती धर्माच्या आधारावर ज्ञानार्जन अथवा ज्ञानदान करणे या गोष्टी निषेधार्थ आहेत. हा विचार स्वअनुभवावर मांडलेला आहे. कुमुद पवाडे या अस्पृश्य वर्गातील आहेत. त्यामुळे त्या संस्कृत शिकू शकत नाहीत व शिकवू शकत नाहीत. हा तत्कालीन उच्चवर्णीयांचा समज खोटा ठरवितात. जातीयतेची मोठी अडथळयांची शर्यंत पार करुन त्या संस्कृत भाषेची एम.ए.ची पदवी मिळवून संस्कृत विषयाच्या प्राध्यापिका म्हणून नोकरीला लागतात. 'सामाजिक न्याय अन मानवी विकासासाठी शिक्षणाचा हक्क' हा विचार या निमित्ताने लेखिका इथे नमूद करताना दिसते.

'मरणकळा' हे जनाबाई गिऱ्हे यांचे गावकुसाबाहेरील गोपाळ समाजाच्या अनंत अडचणींचे अन्न, वस्त्र, निवारा या मुलभूत हक्कांपासून वंचित राहिलेल्या समाजाचे चित्रण करणारे आत्मकथनात्मक पुस्तक आहे. एकूण नऊ प्रकरणामधून लेखिकेने मांडलेले अनुभव माणूस म्हणून जगण्याच्या अधिकारासाठी केलेल्या संघर्षाची शब्दबध्द कहाणी आहे.

पददलित समाजात देखील 'स्त्री—पुरुष' असा भेदभाव करुन महिला, मुलींना शिक्षणाच्या हक्कापासून कसे दूर ठेवले जाते हा अनुभव लेखिकेने मांडून महिलांच्या मानवाधिकाराचे उल्लंघन कसे केले जाते हे नमूद केलेले आहे. उदा. लेखिका शाळेत जाते म्हणून गोपाळ समाजाची जातपंचायत बसते. लेखिकेच्या वडिलांना, मुलींना शाळा शिकवतो म्हणून दंड केला जातो. त्यावेळी, "म्या दंड देतुया, पर पोऱ्ह शिकल्यात, त्यांच्याकडूनही घ्या की दंड, पोऱ्हं हायत मून दंड न्हाय, आन् माही पोर हाय, मून का दंड घेता आरं वा रं

वा!" अशा शब्दात लेखिकेच्या वडिलांनी केलेला युक्तीवाद स्त्रीयांच्या शिक्षणाविषयीच्या हक्काचा पुरस्कार करणारा वाटतो.

शिक्षण नसल्यामुळे अज्ञान, अंधश्रध्दा नसलेला बळी पडणारा गोपाळ समाज, अंगभर कपडा नसलेला भीक मागून जगणारा हा गोपाळ समाज 'चोर' समजून समाजाच्या नाहक त्रासाला कसा बळी पडतो याचे चित्रण करुन "अपराधी जोपर्यंत कायद्याने दोषी आहे असे सिध्द होत नाही तोपर्यंत तो निरपराध आहे असे गृहीत धरले जाण्याचा हक्क आहे." ह्या मानवाधिकारातील सूत्राचा लेखिका पुरस्कार करताना दिसते.

**समारोप**

थोडक्यात कुमुद पवाडे यांचे 'अंतस्फोट' व जनाबाई गिऱ्हे यांचे 'मरणकळा' ही दोन आत्मकथनात्मक पुस्तके पददलित समाजाच्या अन्न, वस्त्र, निवारा, शिक्षण, सामाजिक समानाता, माणूसपणाचे हक्क, स्त्री—पुरुष समानता इ. मानवाधिकाराच्या कक्षेत येणाऱ्या सर्व हक्कांचा पुरस्कार करणारी आहेत. दलित समाजाबरोबरच दलितेतर समाजातील समाजामधील लोकांना हे हक्क मिळाले तरच खऱ्या अर्थाने आदर्श समाजाची उभारणी होईल असा विश्वास या पुस्तकांच्या माध्यमातून मांडून शोषणरहित समाज निर्मिती हे दलित साहित्याचे स्वप्न इथे नमूद होताना दिसते.

**संदर्भ**

१) दलितांची आत्मकथने: संकल्पना व स्वरुप, डॉ. वासुदेव मुलाटे, स्वरुप प्रकाशन, औरंगाबाद.
२) 'अंतस्फोट' — कुमुद पवाडे.
३) 'मरणकळा' — जनाबाई गिऱ्हे.
४) चपळगावकर नरेंद्र, शैलेंद्र देवळणकर, 'माणसाचे अधिकार', यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक.
५) मानवी हक्क, जिज्ञासा प्रकाशन, दत्ता सांगोलकर.